दहेज व हुंड्याची अवैध प्रथा आणि इस्लाम

लेखक
गुलाम रसूल देशमुख

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

इस्लामी शरियत (कायदेशास्त्र)

इस्लाम एक परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अल्लाह आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे परिपूर्ण आज्ञापालन म्हणजेच इस्लाम होय. अल्लाहने अवतीर्ण केलेले मार्गदर्शन (कुरआन) आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यानुसार केलेले आचरण व शिकवण (हदीस, सुन्नत) या दोहोंच्या आधारे शरियत अस्तित्वात येते.

अल्लाहचा आदेश

- "जे लोक अल्लाहच्या आज्ञेनुसार निर्णय करत नाहीत तेच वास्तविकपणे अवज्ञाकारी आहेत." (सूरह-अल्‌माइदा)

तात्पर्य असे की, कोणत्याही मुस्लिमासाठी हे शक्यच नाही की त्याने अल्लाहच्या आज्ञांच्या विरूद्ध वागावे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश

- "तुमच्यापैकी कोणीही तोपर्यंत इमानधारक होऊ शकत नाही जोपर्यंत तो आपल्या इच्छा-आकांक्षांना त्या शरियतच्या अधीन करत नाही जी मी घेऊन आलो आहे." (हदीस)

मुस्लिम म्हणून जगू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी अनिवार्य आहे की, त्याने आपले संपूर्ण जीवन शरियतनुसार व्यतीत करावे. प्रत्येक मुस्लिमाने शरियतच्या विरूद्ध असणाऱ्या व इस्लामी शिकवणींशी मेळ न खाणाऱ्या अशा तमाम अनिष्ठ रूढीपरंपरा व असभ्य, अवैध प्रथा सोडल्याच पाहिजेत. इस्लामची प्रत्येक मुस्लिमाकडून हीच अपेक्षा असून शरियतविरुद्ध वागणे निषिद्ध (हराम) आहे.

विवाहाच्या बाबतीत ज्या अनेक कुप्रथा व इस्लामबाह्य रूढी प्रचलित आहेत त्यांपैकी एक हुंडा व दहेजची कुप्रथा आहे, जी शरियतमधील 'महर'च्या अगदी विरुद्ध आहे.

शरियतने विवाहाच्या बाबतीत वधूपक्षावर कोणतीही जबाबदारी टाकलेली नाही. उलट वरपक्षानेच आपल्या ऐपतीनुसार आवश्यक बाबींवर खर्च करणे भाग आहे.

अल्लाहचा आदेश

- "पुरुष स्त्रियांचे विश्वस्त व पालक आहेत......यास्तव की ते आपली संपत्ती खर्च करतात." (सूरह अन्‌निसा)

संपत्ती खर्च करण्याने अभिप्रेत पत्नीची वस्त्रे, आभूषणे, महर, विवाहोत्तर मेजवानी (वलीमा) आणि पत्नीच्या उदरनिर्वाहाच्या खर्चाचा समावेश आहे. विवाहप्रसंगी 'महर' अनिवार्य आहे. त्याची अदायगी जर रोखीने (महर-ए-मुअज्जल) करण्यात आली तर ते उत्कृष्ट आहे अन्यथा जर उधार व नंतर दिला जाणार असेल (महर-ए-मौज्जल) तर तो कधी आणि कशा प्रकारे अदा

करणार हे निश्चित केले गेले पाहिजे. परंतु महर जर तोंडी जमा-खर्चापुरताच असेल आणि पतीची तो अदा करण्याची इच्छाच नसेल तर अशा पतीबाबत पैगंबर मुहम्मद (स.) यांचे खालीलप्रमाणे कथन आहे,

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश

- "ज्याने ठराविक महरच्या (महर-ए-मौज्जल) मोबदल्यात विवाह केला मात्र मनात महर अदा करण्याचा इरादाच नसेल तर तो पती नव्हे, व्यभिचारी आहे." (हदीस)

यावरून स्पष्ट होते की महर अदा न करणे किती भयंकर अपराध आहे. सध्या विवाहात महरला नगण्य अथवा दुय्यम स्थान दिले जाते मात्र दहेज व हुंड्याला अग्रस्थान दिले जाते. 'महर' अतिशय कमी ठरविला जातो व तोही बहुतेक उधार, पण दहेज व हुंडा जो निषिध्द व हराम आहे तो मात्र भरमसाठ ठरवतात व तोही रोख घेतला जातो. या हराम असलेल्या दहेज व हुंड्याचे प्रदर्शन केले जाते. ते पाहण्यासाठी लोक येतात व त्याची वाहवा करतात. अशाप्रकारचा हरामाचा माल जेवढा अधिक मिळेल तेवढी वराची अपेक्षा व लालसा वाढतच जाते.

अल्लाहचा आदेश

- "हे ईमानधारकांनो! एक दुसऱ्याचा माल अवाजवी, नाहकपणे हिरावून घेऊ नका." (सूरह अन्‌निसा)

या क्रूर व जीवघेण्या हुंडा व दहेजच्या प्रथेला खतपाणी घालण्यात धर्मपंडीत, धार्मिक नेते आणि विचारवंतांचेही मोठे योगदान आहे. हे लोक हुंड्याविरुद्ध घसा कोरडा होईपर्यंत भाषण करतात. त्याचे दुष्परिणामदेखील वर्णन करतात आणि दुसऱ्याच श्वासात या प्रथेला खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांची मान्यता असल्याचे सांगून तिचे समर्थनही करतात. पुराव्यादाखल अली (रजि.) आणि फातिमा (रजि.) यांच्या विवाहाचे उदाहरण दिले जाते. ते असे की, पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या दोहोंच्या विवाहाप्रसंगी दहेज दिला होता आणि तपशीलात चादर, उशी, पाण्याची लहान पखाळ, अंथरूण, चक्की (जाते) वगैरे यादी सादर करतात.

हा संदर्भ घेऊन युक्तिवाद केला जातो की, खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांनीच आपल्या मुलीला असा दहेज दिला असल्यामुळे तो पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आचरण व शरियतला अनुसरूनच आहे. त्याच्याविरुद्ध बोलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वरील घटनेला प्रमाण मानून एका क्रूर व शरियतच्या विरुद्ध असलेल्या हुंडा प्रथेला मोठ्या चातुर्याने 'पवित्र' व 'शरियतमान्य' ठरविले जाते.

वास्तविक घटना अशी आहे की, अबू तालिब (पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते) हे विकलांग व गरीब होते. त्यांचे कुटुंब मात्र मोठे होते. यास्तव पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अबू तालिबांच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी बनू हाशिम घराण्यात विभाजित केली. त्यापैकी एक पुत्र माननीय अली (रजि.) यांच्या पालनपोषणाची जबाबदारी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी

स्वीकारली. माननीय अली (रजि.) तारूण्यात आल्यावर पैगंबर (स.) यांनी आपली सुकन्या माननीय फातिमा (रजि.) हिचा विवाह अली (रजि.) यांच्यासोबत करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा अली (रजि.) यांना विचारले, "तुमच्यापाशी काय आहे?" अली उत्तरले, 'घोडा आणि चिलखत'. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आदेश दिला की, 'चिलखत विकून टाका.' ती माननीय उस्मान (रजि.) यांनी ४८० दिरहमच्या मोबदल्यात खरेदी केली. या रकमेतून वर दर्शविलेल्या गृहोपयोगी वस्तू खरेदी केल्या. या वस्तू माननीय अली (रजि.) यांच्या पैशातून घेतल्या असल्याने त्यांना 'दहेज' कसे म्हणता येईल? उर्वरीत रकमेतून 'महर' आणि विवाहोत्तर भोजन (वलीमा) आदींसाठी खर्च करण्यात आला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या वस्तू स्वत: जरी दिल्या असत्या तरी अलींच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्याकडेच असल्याने त्या वस्तू हुंडा अथवा दहेज कदापि ठरत नाहीत.

दुर्दैवाने काही लोकांनी माननीय अली (रजि.), माननीय फातिमा (रजि.) व त्यांच्या संततीलाच इस्लामच्या केंद्रस्थानी मानून त्यांनाच इस्लामच्या शिकवणींचा आधार बनविले आहे. मात्र पैगंबरांच्या इतर कन्यांकडे हे लोक हेतुपुरस्सर दुर्लक्ष करतात. आपल्या इतर कन्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काय दहेज दिला याचा हे लोक उल्लेख करत नाहीत. वास्तव हे आहे की, खुद्द पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अनेक विवाह केले. आपल्या कन्या माननीय जैनब (रजि.), रूकैया (रजि.), माननीय उम्मे कुलसूम (रजि.) यांचेही विवाह केले. याशिवाय त्यांचे सोबती (सहाबी) चार आदर्श खलीफा (रजि.) व नंतरच्या सुप्रसिद्ध मुस्लिम विद्वानांच्या विवाहप्रसंगी कुठेही दहेजची ही कुप्रथा सापडत नाही. जर दहेजची प्रथा पैगंबरांना व धर्मशास्त्रास मान्य असती तर ती शरियतने सर्व मुस्लिमांना अनिवार्य केली असती.

ही गोष्ट वराच्या पुरुषार्थालाही शोभत नाही की, त्याने वधूकडील पोषाख परिधान करून विवाह करावा. वधूपक्षाकडून हुंड्याच्या स्वरूपात घेतलेल्या संपत्तीवर ऐश, विलास करावा. आपल्या भावी पत्नीजवळ हुंड्याची मागणी करावी किंवा मिळेल त्याचा निर्लज्जपणे स्वीकार करावा. ही तर त्याच्या पती नव्हे, भिकारी असण्याची लक्षणे आहेत.

मुलीवर एक घोर अन्याय स्वत: तिचे माता-पिता करतात. ते दहेज व हुंडा कसेही करून स्वखुषीने देतात. मात्र मुलीला वारसाहक्कापासून वंचित ठेवतात. हा मुलींचा शरियत अनुसार अनिवार्य हक्क आहे. जर हा ऐहिक जीवनात दिला गेला नाही तर पारलौकिक जीवनात पुण्य आचरणातून द्यावाच लागेल.

एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, अल्लाहने पुरुष व स्त्रीची जोडी वंशवृद्धीसाठी बनविली आहे. स्त्री ही आई, बहीण, मुलगी, सून वगैरे असते. मनुष्य स्त्रीपोटी जन्म घेतो म्हणून तिचा आदर-सन्मान व प्रतिष्ठा राखली पाहिजे. स्त्रीला संपत्तीप्राप्तीचे साधन कदापि समजू नये.

स्त्रीचे कर्तव्य मुलाबाळांचे संगोपन, घराची देखभाल, कुटुंबामध्ये सुख-शांती प्रदान करणे व आपल्या घराला स्वर्गासमान बनविणे हे आहे. स्त्रीचे हे उद्देश नजरेसमोर नसल्याने तिला धन,

सामुग्री (दहेज हुंडा) प्राप्तीचे साधन समजले जाते. म्हणूनच रोज हुंडाबळी किंवा आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या बातम्या वाचायला व ऐकायला मिळतात, हे एक दुर्दैव आहे.

या अत्याचाराला जबाबदार कोण...?

- काय त्या मुली ज्या हुंडा देऊ शकत नाहीत?
- काय ते माता-पिता जे कन्येच्या जन्मापासून हुंड्याच्या चिंतेने त्रस्त होऊन शेवटी कर्जबाजारी आणि दिवाळखोर होत आहेत?
- काय तो मुस्लिम समाज जो या कुप्रथेच्या बाबतीत असंवेदनशील झाला आहे? नववधूंना हुंडाबळी होताना पाहूनही जो निष्क्रीय भूमिका घेतो.
- काय ते धनदांडगे लोक जे आपल्या नावलौकिकासाठी संपत्तीचे प्रदर्शन करतात?
- काय ते धर्मपंडित जे हुंड्याच्या विरोधात भाषणबाजी तर करतात पण प्रत्यक्षात स्वत: हुंडा घेऊन किंवा देऊन त्याचे अप्रत्यक्ष समर्थनही करतात?
- काय ते धार्मिक नेते ज्यांनी मोठ्या चातुर्याने हुंड्यास पवित्र व शरियतमान्य बनविले आहे?अल्लाह समस्त मुस्लिमांना शरियतनुसार वागण्याची सद्‌बद्धी देवो व शरियतचा अपमान करण्यापासून परावृत्त करो. ही दुआ ! आमीन.

इस्लाममध्ये नारीचे स्थान

आई

माननीय अबू हुरैरा (रजि.) चे कथन आहे की एक मनुष्य पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे आला व म्हणाला,

- "हे अल्लाहचे पैगंबरा! माझ्या सद्‌व्यवहारास सर्वाधिक पात्र कोण आहे?"

पैगंबर म्हणाले! "तुझी आई!"

त्याने विचारले, "त्यानंतर कोण?"

पैगंबर म्हणाले! "तुझी आई!"

त्याने पुन्हा विचारले, त्यानंतर कोण?"

पैगंबरांनी सांगितले, "तुझी आई!"

त्याने विचारले, त्यानंतर कोण?"

मग पैगंबर म्हणाले, "तुझे वडील." (हदीस)

अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असे ही सांगितले आहे,

- "आईच्या चरणांखाली स्वर्ग आहे," (हदीस)

पवित्र कुरआनमध्ये अल्लाहने सांगितले आहे,

● "आम्ही मनुष्याला आदेश दिला, त्याने आपल्या आईवडिलांशी सद्व्यवहार करावा, त्याच्या आईने त्रास सहन करून त्याला पोटात ठेवले व कष्ट सहन करून त्याला जन्म दिला. त्याला गर्भात ठेवण्यात व स्तनपान करविण्यात तीस महिने लागले."

(सूरह अल्‌अह्‌काफ - १५)

पत्नी

पवित्र कुरआनमध्ये अल्लाहने सांगितले आहे,

● "त्याच्यामधून चिन्हांपैकी असेही आहे की, त्याने तुम्हासाठी तुमच्या जोड्या बनविल्या, जेणेकरून तुम्ही त्यांच्याजवळ शांती प्राप्त करावी आणि तुमच्यात प्रेम व कृपा उत्पन्न केली. निश्चितच यात संकेत आहेत, त्या लोकांसाठी जे चिंतन व मनन करतात."

(सूरह अर्‌रूम - २१)

● पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, "कोणत्याही श्रद्धावंताने एखाद्या श्रद्धावंत स्त्रीशी (पत्नीशी) घृणा करू नये, तिची एखादी सवय आवडली नाही तर दुसरी आवडेल."

(हदीस)

पैगंबरांना प्रश्न केला गेला की सदाचारी व पुण्यशील नारी मध्ये कोणते गुण असतात?

● पैगंबरांनी उत्तर दिले, "जेव्हा पती तिला पाहील तेव्हा पत्नीने त्याला प्रसन्न करावे, जेव्हा एखादी आज्ञा करील ती मान्य करावी आणि आपले शील व त्याच्या संपत्तीचे रक्षण करावे आणि त्यात त्याची अवज्ञा करू नये." (हदीस)

दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तर देताना पैगंबरांनी सांगितले,

● "हे जग जीवन व्यतीत करण्यासाठी अल्लाहची सर्वोत्तम कृपा पुण्यशील स्त्री आहे."

(हदीस)

● "नि:संशय दानधर्म करणारे पुरुष व दानधर्म करणाऱ्या स्त्रिया आणि ज्यांनी अल्लाहला चांगले ऋण दिले त्यांना वाढवून दिले जाईल व त्यांच्यासाठी उत्तम मोबदला आहे."

(हदीस)

● पत्नीला टोमणे मारू नका. तोंडावर मारू नका. तिचे मन दुखवू नका. तिला सोडून देऊ नका. (हदीस)

● पत्नी आपल्या पतीच्या जागी (त्याच्या गैरहजेरीत) सर्व अधिकारांची मालकीण आहे.

(हदीस)

● आपल्या पत्नीशी दासीसमान व्यवहार करू नका. तिला मारूही नका. (हदीस)

● तुमच्यापैकी सर्वश्रेष्ठ मनुष्य तो आहे जो आपल्या पत्नीशी चांगला व्यवहार करतो.

(हदीस)

मुलगी

पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे,

- "ज्या कोणाच्या तीन मुली अथवा तीन बहिणी असतील अथवा दोन मुली व दोन बहिणीच असतील आणि त्याने त्यांचे चांगले संगोपन केले आणि त्यांच्या संबंधाने अल्लाहचे भय बाळगले, तर त्याच्यासाठी स्वर्ग आहे." (हदीस)
- "मुलींचा तिरस्कार करू नका. त्या तर दु:खनिवारक आणि अत्यंत मौल्यवान आहेत." (हदीस)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे उपदेश

- तुमच्यापैकी कोणीही बाजारात भाव वाढावेत म्हणून (धान्य वगैरे) वस्तू न विकता (साठा करून) ठेवू नका, असे करणारा घोर यातनेस पात्र आहे.
- दुसऱ्याचे अपराध क्षमा करीत जा. दुसऱ्यांच्या दोषांचा प्रचार करू नका, ते लपवा, ईश्वर तुमच्या दोषांवर पांघरूण घालील.
- खोटे बोलणे, चहाड्या करणे, खोटे आरोप करण्यासापासून दूर राहा लोकांना वाईट नावाने हाक मारू नका.
- अश्लीलता व निर्लज्जतेपासून दूर राहा, मग ती उघड असो की गुप्त.
- दिखाऊपणा करू नका, गुप्त दान करा. उपकार करून त्याची जाणीव करून देवू नका.
- रस्त्यावरील त्रासदायक वस्तू (काटे, दगड, धोंडे) काढून टाका.
- आपले वचन व प्रतिज्ञा पूर्ण करा.
- सत्य व न्याय्य साक्ष द्या. मग तुमचे स्वत:चे अथवा तुमच्या कुटुंबियाचे नुकसान झाले तरी बेहतर.
- मजुराचा घाम वाळण्यापूर्वी त्याची मजुरी द्या. कोणत्याही नोकराकडून त्याच्या शक्तीप्रमाणे कामे करवून घ्या. त्याला विश्रांती द्या. तुम्ही स्वत: जे खाल ते त्याला द्या व जे स्वत: परिधान कराल ते त्यालासुद्धा उपलब्ध करा.

-०- समाप्त -०-